माहिती व विक्री अधिकारी (वर्ग-१) हे पद रद्द करुन त्या ऐवजी अधिक्षक अभियंता (स्थापत्य) हे पद निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : पीसीएन - ३०१४/१०९६/ प्र.क्र.४७७/ नवि-२२

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- २.२.२०१६

<u>वाचा</u>:- मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक विप्रा/ प्रशा/२३२६, दिनांक ११.९.२०१४ व क्रमांक विप्रा/प्रशा/(२५/२०१४)/३०९८,दि.१६.१२.२०१४

<u>प्रस्तावना</u> :-

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील अभियांत्रिकी विभागामध्ये प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या विकास कामांची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणातील मंजूर व सद्य:स्थितीत रिक्त असलेल्या माहिती व विक्री अधिकारी (वर्ग-१) या पदाचे रुपांतर अधिक्षक अभियंता या एका पदात रुपांतर करण्याचा निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक २५.७.२०१४ च्या बैठकीतील विषय क्र. ३५ मध्ये निर्णय आला. त्यानुसार माहिती व विक्री अधिकारी (वर्ग-१) हे पद रद्द करुन त्या ऐवजी अधिक्षक अभियंता (स्थापत्य) हे पद मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या दिनांक २५.७.२०१४ च्या बैठकीतील विषय क्र. ३५ मधील निर्णयानुसार, प्राधिकरणात मंजूर असलेले माहिती व विक्री अधिकारी (वर्ग-१) हे पद रद्द करुन त्या ऐवजी अधिक्षक अभियंता (स्थापत्य) या संवर्गात एक पद (वेतनबँड रुपये १५६००- ३९१०० व ग्रेड वेतन रुपये ७६००/-) शासनाच्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीने भरण्याच्या अटीच्या अधीन राहून मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०२०२१२३७५८०५२५ असा आहे .हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने ,

Eknath Kisan Sahane

Digitally signed by Eknath Kisan Sahane
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Eknath Kisan Sahane
Date: 2016.02.02 12:40:16 +05'30'

(ए. कि. सहाणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत - ,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे,
३) जिल्हाधिकारी, पुणे,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे
५) निवड नस्ती - नवि-२२.